महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ८६ वे | दिनांक : १९/०३/२०२६ | वार : गुरूवार

## अजित पवारांच्या अपघातावर विधानसभेत चर्चा नाहीच : स्थगन प्रस्ताव फेटाळला



**मुंबई** : अजित पवारांसारख्या राज्यातील एका प्रमुख नेत्याच्या संशयास्पद अपघाती मृत्यूवर विधिमंडळात चर्चा करू दिली जात नाही. याचा अर्थ काय? यावरून या अपघातामागे एक मोठी शक्ती असल्याच्या आमच्या संशयाची एकप्रकारे पुष्टीच झाली आहे, असा दावा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी केला आहे. त्यांच्या या दाव्यामुळे राज्यात या अपघातामागील 'ती मोठी शक्ती कोण?' असा प्रश्न विचारला जात आहे.

अजित पवार यांचे गत २८ जानेवारी रोजी बारामती येथील एका विमान अपघातात मृत्यू झाला होता. तेव्हापासून हा अपघात नव्हे तर घातपात असल्याचा आरोप केला जात आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या नेत्यांनी वारंवार हा मुद्दा उपस्थित केला आहे. विशेषतः आमदार रोहित पवार व अमोल मिटकरी यांनी हा मुद्दा विधिमंडळात उपस्थित करून त्यावर चर्चा करण्याची मागणी केली होती. रोहित पवार यांनी मंगळवारीच या प्रकरणी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांची भेट घेऊन त्यांच्याकडे या मुद्यावर विधिमंडळाच्या पटलावर चर्चा करण्याची मागणी केली होती. पण राहुल नार्वेकर यांनी आज सभागृहात यासंबंधी मांडलेला स्थगन प्रस्ताव फेटाळून लावला.


रोहित पवार यांनी यावर तीव्र संताप व्यक्त केला. ते एका पोस्टद्वारे म्हणाले, अजितदादांसारख्या राज्यातील एका प्रमुख नेत्याचा विमान अपघातात मृत्यू होतो आणि त्यांच्या या अपघातावर विधिमंडळात चर्चाही करु दिली जात नाही. याबाबत विस्तृत चर्चेची मागणी कालच विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर साहेब यांच्याकडं केली होती. आज हा स्थगन प्रस्ताव स्वीकारून अजितदादांच्या अपघातावर विस्तृत चर्चा होईल अशी अपेक्षा होती.पण अध्यक्षांनी हा स्थगन प्रस्ताव नाकारला आणि विधानसभेत इतर विषयांवर बोलण्याची अनुमती दिली. या ज्वलंत विषयावर बोलण्याचा प्रयत्न केला असता बोलूही दिलं गेलं नाही, याचा अर्थ काय? यावरुन या अपघातामागे नक्कीच कोणती तरी एखादी मोठी शक्ती असल्याचा आमचा संशय असून या निर्णयामुळं आमच्या संशयाला एकप्रकारे पुष्टीच मिळत आहे. सरकारने अजितदादांच्या अपघाताच्या विषयाला कितीही दाबण्याचा प्रयत्न केला तरी आम्ही मात्र हा विषय सोडणार नाही... अजितदादांना न्याय मिळावा यासाठी पाठपुरावा करतच राहू, असे त्यांनी म्हटले आहे.

रोहित पवार यांनी या प्रकरणी पत्रकारांशीही संवाद साधला. त्यातही त्यांनी सरकारवर टीका केली. ते म्हणाले, आमचा आवाज दाबला जात आहे. अजितदादांविषयी आम्ही जेव्हा केव्हा बोलण्याचा प्रयत्न करतो, तेव्हा आम्हाला बोलू दिले जात नाही. त्यावरून आपल्याला समजून घ्यावे लागेल की, सत्तेतल्या लोकांनाच यावर चर्चा करायची नाही. हा अपघात का घातपात? यावर चर्चा होऊ दिली जात नसेल तर सत्ताधाऱ्यांपैकीच कुणीतरी एक असा व्यक्ती आहे जो दादांच्या अपघाताला जबाबदार असू शकतो.

या व्यक्तीचे नाव बाहेर येऊ नये, त्याबद्दलची चर्चा होऊ नये, यासाठीच आम्हाला एफआयआर करू दिला जात नाही. आम्हाला चर्चाही करू देत नाही. या प्रकरणी सीबीआयकडे अजून प्रस्ताव पाठवला गेला नाही. पण सत्ताधाऱ्यांपैकी एक पक्ष (राष्ट्रवादी) स्मरणपत्रावर स्मरणपत्र पाठवत आहे. अजित पवारांसारख्या मोठ्या नेत्याला न्याय देता नसेल, तर सर्वसामान्य जनतेचे काय? असा सवाल रोहित पवार यांनी या प्रकरणी उपस्थित केला.

## भविष्य सांगण्याच्या बहाण्याने महिलेवर अत्याचार





**नाशिक** : स्वतःकडे दैवी शक्ती असल्याचा खोटा दावा करून मंत्र-तंत्र आणि धार्मिक विधींच्या नावाखाली महिलेवर अत्याचार करणाऱ्या अशोक खरात उर्फ 'कॅप्टन' याला नाशिक पोलिसांनी बुधवारी (१८ मार्च) पहाटे अटक केली. मर्चंट नेव्हीतील निवृत्त अधिकारी आणि प्रसिद्ध अंकशास्त्रज्ञ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अशोक खरातच्या या कृत्यामुळे राजकीय आणि सामाजिक वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. संशयित खरात याला आज जिल्हा न्यायालयात हजर केले जाणार आहे. विशेष म्हणजे अनेक राजकीय नेते, अधिकारी, सेलिब्रिटी आपले भविष्य जाणून घेण्यासाठी अशोक खरात याच्याकडे जात होते

पीडित महिलेने दिलेल्या फिर्यादीनुसार, अशोक खरातने आपल्याकडे दैवी शक्ती असल्याचा खोटा दावा केला होता. मंत्र-तंत्र आणि धार्मिक विधीच्या नावाखाली त्याने फिर्यादीचा विश्वास संपादन केला. त्यानंतर तिला ऑफिसमध्ये बोलावून गुंगीकारक पदार्थ खायला दिले आणि तिच्यावर अत्याचार केला. हा प्रकार २०२२ पासून ते डिसेंबर २०२५ पर्यंत सातत्याने सुरू होता, असे तक्रारीत नमूद करण्यात आला आहे.

गुन्हे शाखेने अशोक खरातला ताब्यात घेतल्यानंतर त्याच्याकडील साहित्याची झडती घेतली. यावेळी पोलिसांच्या हाती एक पेनड्राइव्ह लागला असून, त्यात तब्बल ५८ आक्षेपार्ह व्हिडीओ आढळले आहेत. धक्कादायक बाब म्हणजे, या व्हिडिओंमध्ये काही नामांकित महिला आणि सेलिब्रिटींच्या संदर्भातील चित्रीकरण असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. पोलिस आता या व्हिडीओंच्या सत्यतेची पडताळणी करत आहेत.

अशोक खरात हा सिन्नर तालुक्यातील मिरगाव येथील 'श्री ईशान्येश्वर मंदिर' (शिवनिका संस्थान) चा अध्यक्ष आहे. नोव्हेंबर २०२२ मध्ये एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री असताना या मंदिराला भेट दिली होती, तेव्हापासून अशोक खरात प्रसिद्धीच्या झोतात आला होता. विशेष म्हणजे, या संस्थेच्या विश्वस्त पदावर राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांचे नाव असल्याचे समजते.अनेक मोठे राजकीय नेते, वरिष्ठ अधिकारी आणि चित्रपटसृष्टीतील सेलिब्रिटी भविष्य जाणून घेण्यासाठी त्याच्याकडे जात असत. आता आपल्याच संस्थेच्या अध्यक्षावर बलात्काराचा गुन्हा दाखल झाल्याने रूपाली चाकणकर काय भूमिका घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## मराठा सेवा संघाच्या पुरुषोत्तम खेडेकरांची निर्दोष सुटका




**पुणे** : ब्राह्मण समाजाविरोधात भडकाऊ लेखन केल्याप्रकरणी मराठा सेवा संघ आणि संभाजी ब्रिगेडचे संस्थापक पुरुषोत्तम सूर्यभान खेडेकर (वय 77) आणि प्रकाशक किशोर साहेबराव कडू (वय 42) यांची पुणे येथील प्रथम वर्ग न्यायाधीश पी. बी. पाटील यांनी निर्दोष मुक्तता केली आहे. खेडेकर यांनी 'शिवरायांच्या बदनामीचे केंद्रे' या शीर्षकाखाली एक पुस्तक लिहिले होते. या पुस्तकाच्या मुखपृष्ठावर छत्रपती शिवाजी महाराज आणि विधानसभेचे छायाचित्र होते. पुस्तकात ब्राह्मण पुरुष षंढ असतात आणि ब्राह्मण स्त्रिया मराठा समाजातील पुरुषांकडून स्वतःच्या इच्छा पूर्ण करून घेतात, अशा आशयाचे लेखन केल्याचा आरोप होता. या पुस्तकामुळे दोन समाजात तेढ निर्माण होऊन दंगली होण्याची शक्यता असल्याचा दावा करत भाजपाचे माजी नगरसेवक शाम ज्ञानदेव सातपुते (रा. पुणे) यांनी बंडगार्डन पोलीस ठाण्यात खेडेकर आणि प्रकाशक कडू यांच्या विरोधात फिर्याद दाखल केली होती. या खटल्याचे कामकाज पाहण्यासाठी सरकारच्या वतीने विशेष आणि ज्येष्ठ सरकारी वकिलांची नेमणूक करण्यात आली होती. खेडेकर आणि कडू यांच्या वतीने ॲड. मिलिंद दत्तात्रय पवार यांनी न्यायालयात बाजू मांडली. या प्रकरणात जेम्स लेन या अमेरिकन लेखकाने पुण्यातील भांडारकर इन्स्टिट्यूटमधून माहिती घेऊन 'शिवाजी; द हिंदू किंग इन इस्लामिक इंडिया' नावाचे पुस्तक लिहिले होते. त्या पुस्तकात छत्रपती शिवाजी महाराजांच्या मातोश्री जिजामाता यांच्याविषयी चुकीची आणि त्यांच्या चारित्र्यावर शिंतोडे उडवणारी माहिती भांडारकर इन्स्टिट्यूटमधील काही ब्राह्मण समाजातील लोकांनी जाणीवपूर्वक पुरवली होती, असे जेम्स लेन यांनीच जाहीर केले होते.

छत्रपती शिवाजी महाराज व मा जिजाऊ यांच्या विषयी अतिशय घाणेरडे लिखाण जेम्स लेन या अमेरिकन लेखकाने केले व त्याला पुण्यातील ब्राह्मणांनी मदत केली त्या द्वेषातून शिवरायांच्या बदनामीचे केंद्रे या पुस्तकाचे या शीर्षकाखाली त्या रोषातून पुरुषोत्तम खेडेकर यांनी ते पुस्तक लिहिले असे पोलिस तपासात पुरुषोत्तम खेडेकर यांनी पोलिसांना सांगितले होते.

पुणे येथील न्यायालयामध्ये "शिवरायांच्या बदनामीचे केंद्रे" हे पुस्तक पुरुषोत्तम खेडेकर यांनीच लिहिले व किशोर कडू यांनीच ते प्रकाशित केल्याचे सरकार पक्षाला सिद्ध करण्यास अपयश आले. लिखाणाचे स्वातंत्र्य घटनेने दिलेले आहे त्या पुस्तकावरून कुठल्याही समाजामध्ये तेढ निर्माण झाली किंवा दंगली झाल्या असे काही घडलेले नाही. फक्त त्रास देण्याच्या उद्देशाने खोटी फिर्याद व खोटा खटला पुरुषोत्तम खेडेकर व प्रकाशक किशोर कडू यांच्या विरोधात दाखल केला.

खटला गंभीर नसताना किंवा कुठलेही संयुक्तिक कारण नसताना फक्त सत्तेचा गैरवापर करून या खटल्यात जाणीवपूर्वक मराठा महासंघाचे संस्थापक अध्यक्ष यांच्या विरोधात विशेष सरकारी वकीलांची नेमणूक केली असल्याचा युक्तिवाद ॲड. मिलिंद पवार, ॲड. हर्षवर्धन मिलिंद पवार, ॲड. सुयोग गायकवाड, ॲड सारंग बहिरट, ॲड. ज्ञानेश्वरी जाधव यांनी केला. सदर युक्तिवाद ग्राह्य धरून पुरुषोत्तम खेडेकर व किशोर कडू यांची सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्त केली.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १९ मार्च २०२६

## किनगाव राजा पोलिसांची धडक कारवाई सोन्याची पोत चोरी करणारा आरोपी दोन तासात अटक



**बुलढाणा (महेश मुंढे) :** ऐका पाठोपाठ तीन चोरीच्या गुन्हयातील पाच आरोपीनां बेड्या चार आरोपींची कारागृहात रवानगी एकाला पीसीआर मंजूर दिनांक ०३/०२/ २०२६ रोजी फिर्यादी नामे उदय एकनाथ काकडे वय ४२ वर्ष व्यवसाय खाजगी नोकरी यांनी पोलीस स्टेशनला येऊन दिलेल्या तोंडी रिपोर्ट वरून पोस्टेला दाखल अपराध क्रमांक ८१/२६ कलम ३०३ (२) ३(५) bns गुन्ह्याच्या तपासादरम्यान पोलिसांनी शिताफीने आरोपी नामे देवानंद शंकर डोईफोडे रा केशव शिवनी ता सिंदखेड राजा तसेच विलास भाऊलाल दुनडियार रा दुसरबीड यास अटक केली असता त्यांनी सदरील गुन्ह्यात त्यांच्यासोबत सौरभ अभिजीत सर्जेराव देशमुख रा दुसरबीड हा सुद्धा शामिल असल्याचे सांगितले गुन्ह्याचा सखोल व बारकाईने तपास केला असता त्यामध्ये दुसर बीड मधील आरोपी नामे मंगेश कुंडलिक अवचार वय २२ वर्षहा सुद्धा गुन्ह्यात सहभागी असल्याचे निष्पन्न झाले तसेच दिनांक १७/ ३/ २०२६ रोजी फिर्यादी नामे गजानन भगवान ताठे वय ४६ वर्ष रा दुसर बीड तालुका सिंदखेड राजा यांनी पोलीस स्टेशनला येऊन रिपोर्ट दिला की त्यांच्या आईच्या गळ्यातील १३ ग्राम सोन्याचे मनी व दोन ग्राम पानाडी असलेली सोन्याची पोत किंमत अंदाजे एक लाख ५० हजार १०० रुपयाची आरोपी नामे दत्ता प्रकाश बिथरे रा दुसर बीड याने फिर्यादी यांच्या आईच्या गळ्याला चाकू लावून जीवाने मारण्याची धमकी देऊन घेऊन पळून गेला असून त्याच्यासोबत आणखीन दोन आरोपी सामील असल्याचे त्यांनी दिलेल्या रिपोर्ट मध्ये सांगितले वरून पोलिसांनी आरोपी नामे दत्ता प्रकाश बिथ्रे वय ३८ वर्ष राहणार दुसर बीड यास दिनांक १७/०३/ २०२६ रोजी चे सायंकाळी गंधारी येथून यशस्वी सापळा रचून गुन्ह्यात अटक करण्यात आलेली आहे तसेच नमूद आरोपीची कसून चौकशी केली असता आरोपी नामे विलास भाऊलाल दुनिया तसेच दत्ता प्रकाश बिथरे यांनी पोस्ट किनगाव राजा येथे दाखल अपराध क्रमांक २२/२६ कलम ३०३ (२)मधील फिर्यादी नामे शेख अबरार शेख जब्बार व्यवसाय शेती राहणार दुसर बीड यांच्या ग्राम दुसर बीड शिवारातील त्यांच्या शेतातील सहा शेळ्या व दोन बोकड किंमत अंदाजे एकूण ७४ हजार रुपयांच्या मुद्देमाल चोरून नेला असल्याची सुद्धा कबुली दिली आहे सदरील गुन्ह्याचा तपास माननीय ठाणेदार सपोनी संजय मातोंडकर साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेका विष्णू मुंडे हे करत असून आरोपी अटकेची कारवाई माननीय ठाणेदार सा यांच्या आदेशाने पोका जीवन जायभाये शि राज शहा ,विजेता पवार, ज्ञानेश्वर दहातोंडे ,मिलिंद सोनपसारे यांनी पार पाडलेली आहे नमूद आरोपी पैकी चार आरोपी यांना बुलढाणा येथील कारागृहात हलविण्यात आलेले असून आरोपी नामे दत्ता प्रकाश बिथ्रे यास पोलीस रिमांड मध्ये ठेवण्यात आलेले आहे

## कलदेव निंबाळा ग्रामपंचायतच्या उपसरपंच पदी मीराताई पाटील बिनविरोध



**उमरगा (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** जिल्ह्यातील उमरगा तालुक्यातील कलदेव निंबाळा गावच्या ग्रामपंचायतच्या उपसरपंचपदी नुकतीच मीराताई रमेश पाटील यांची बिनविरोध निवड झाली.सलग दुसऱ्या पंचवार्षिक मध्ये ग्रामपंचायत निवडणुकीत भरघोस मतांनी निवडून आलेल्या मीराताई पाटील यांची नुकतीच ग्रामपंचायत कार्यालय कलदेव निंबाळा येथे माननीय के. बी. भांगे विस्तार अधिकारी पंचायत समिती उमरगा यांच्या उपस्थितीत बिनविरोध निवडीची प्रक्रिया पूर्ण झाली. यावेळी सुनील पाटील, विस्तार अधिकारी, पंचायत समिती, उमरगा, विद्यमान सरपंच महादेव कांबळे, ग्रामसेवक माननीय सुनील पांचाळ साहेब ,तलाठी माननीय गायकवाड साहेब, ग्रामपंचायत सदस्य पल्लवी डोणगावे, सविता पाटील ,रुक्मीन भंडे, सुरेश बलसुरे, गुरप्पा बोकडे ,सुनीता पावशेरे, राजोत्तम गायकवाड उपस्थित होते. निवडीनंतर राहुल स्वामी, निवृत्त पोलीस पाटील पांडुरंग पाटील, मोहन पाटील, शिक्षण विस्ताराधिकारी, चंद्रकांत पाटील, डॉ. रमाकांत पाटील डॉ. शुभांगी पाटील यांनी शाल, पुष्पहार, पुस्तक देऊन मीराताई पाटील आणि कृषी सहाय्यक रमेश पाटील यांचा सपत्नीक सत्कार केला.सर्वश्री बाबुराव पावशेरे, अनिरुद्ध पवार, शिवाजी रसाळ, संतोष डोणगावे, सुनील बलसुरे, उमाकांत पाटील,संजय घोटमाळे, गणपती मुसांडे, श्रीपती मुसांडे, तुकाराम डोणगावे, व्यंकट पाटील, किरण स्वामी, श्रीधर बिराजदार, देविदास पावशेरे, प्रभाकर बिराजदार, राजेंद्र पावशेरे, वसंत कारभारी, बाळू कुलकर्णी, हरिदास कल्याणकर, हर्ष कांबळे, मारुती गायकवाड, बंडू पाटील, संजय पाटील, शिवहार पाटील,शैलेश पाटील, महेश पाटील, सुरज पाटील, अरुण डोणगावे, बाबुराव पाटील ,मल्लिनाथ कारभारी, देविदास सूर्यवंशी, दयानंद सूर्यवंशी, राजाराम भांडेकर ,मधुकर घोटमाळे, पप्पू बिराजदार, दयानंद सूर्यवंशी, गोपाळ सरवदे, उत्तम सरवदे उपस्थित होते. एकाधिकारशाही न गाजवता गावामध्ये सर्वांना सोबत घेऊन सलोख्याचे वातावरण निर्माण करून ग्राम विकासाला चालना देणार असल्याचे उपसरपंच मीराताई पाटील यांनी सांगितले. ग्रामसेवक मारुती कांबळे, सोलापूर, संतोष कांबळे यांनी नूतन उपसरपंच मीराताई पाटील आणि कृषी सहाय्यक रमेश पाटील यांचा सत्कार केला. असंख्य चाहत्यांनी मीराताई पाटील यांच्यावर समाज माध्यमांवरून आणि प्रत्यक्ष भेटून शुभेच्छांचा वर्षाव करत पुढील यशस्वी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## दीड लाख शेतकऱ्यांची फसवणूक झाल्याची सरकारकडून कबुली



**मुंबई :** महाराष्ट्राच्या महसूल विभागात मोठा गैरप्रकार झाल्याचे उघडकीस आले आहे. जमिनीच्या सातबारा उताऱ्यातच फेरफार करून तब्बल एक ते दीड लाख शेतकऱ्यांची फसवणूक झाल्याची कबुली सरकारने दिली आहे. महाराष्ट्र जमीन महसूल कायद्याच्या कलम १५५ चा गैरवापर करून महसूल अधिकाऱ्यांनी बेकायदेशीर आदेश पारित केल्याने हा प्रकार घडला असल्याचे समोर आले आहे.

महाराष्ट्र जमीन महसूल कायद्यातील कलम १५५ चा वापर ७/१२ मधील उताऱ्यातील लेखनदोष किंवा शुद्धलेखनातील चुका दुरुस्त करण्यासाठी केला जातो. मात्र, पुण्यातील काही महसूल अधिकाऱ्यांनी या कलमचा गैरवापर करत जमिनीच्या मालकी हक्कतच परस्पर बदल केले आहेत. जुलै-ऑगस्ट २०२५ च्या काळात हा गैरप्रकार झाल्याचे उघडकीस आले आहे.

शिवसेना ठाकरे गटाचे आमदार अनिल परब यांनी या विषयाकडे लक्ष वेधले होते. त्यानंतर या घटनेची व्याप्ती व गांभीर्य लक्षात घेता विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली एक चौकशी समिती नेमण्यात आली होती. विभागीय आयुक्तांनी सादर केलेल्या अहवालात महसूल प्रशासनातील या गैरप्रकारावर प्रश्न उपस्थित करण्यात आले. चौकशीत असे समोर आले की अनेक प्रकरणांत मूळ मालकाची संमती नसताना देखील ७/१२ मध्ये बदल करण्यात आले आहेत. तसेच नियमबाह्य पद्धतीने बेकायदेशीर आदेश पारित करून खाजगी हितसंबंध जपल्याचे समोर आले आहे.

या घटनेवर विधान परिषदेत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्टीकरण देत झालेल्या चुकीची कबुली दिली आहे. ते म्हणाले, शुद्धलेखनात बदल करण्याच्या नावाखाली सातबारा बदलले गेले, ही बाब गंभीर आहे. महसूल खात्याच्या इतिहासातील हा आत्तापर्यंतचा सर्वात मोठा घोटाळा असू शकतो, असे त्यांनी म्हटले आहे. तसेच जवळपास एक ते दीड लाख शेतकरी या प्रक्रियेत भरडले गेल्याचेही त्यांनी मान्य केले आहे.

शिवसेना ठाकरे गटाचे आमदार अनिल परब यांनी या घोटाळ्यातील मुख्य सूत्रधार तसेच सहभागी अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी केली आहे. आता या प्रकरणी दोषी तहसीलदार ते वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत कोणावर कारवाई होणार याकडे सर्वांचे लक्ष असणार आहे. अधिवेशन संपायच्या आत दोषींवर कारवाई करू, असे आश्वासन चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहे.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १९ मार्च २०२६


## गुलामगिरीची बेडी

शाळा नाही दुकान, ज्ञान नाही माल,
गरिबाच्या लेकरांना हाकलून, मांडली लुटीची चाल ॥१॥

मोफत शिक्षण पायदळी, शिक्षणहक्क रस्त्यावर,
कंत्राटदारांच्या ताटाखाली, सरकार झालं दास ॥२॥

आरक्षणाचं आमिष देऊन, नोकऱ्या केल्या खलास,
ठेकेदारांच्या पायाशी, बांधला रयतेचा श्वास ॥३॥

स्पर्धा परीक्षांचा लिलाव, नोकऱ्यांचा झाला बाजार,
लोकशाहीचा गळा आवळून, बसला भांडवलदार ॥४॥

जिओसारखी ही योजना-आधी गोड मग जाळ,
फुकट शिकवून पुढे, फीचा बसवला काळ ॥५॥

फी वाढली—पोरं बाहेर, शाळेचं दार बंद,
अज्ञानाच्या राखेतून, गुन्ह्यांचा पेटला धंदा ॥६॥

फुलेंनी उघडली दारे, सावित्रीने पेटवली क्रांतीज्योत,
शाहूंनी दिलं रयतेस शिक्षण, कर्मवीरांनी रुजवला वटवृक्ष ॥७॥

बाबासाहेब गर्जले — "शिक्षण वाघिणीचं दूध",
शाळा विकणाऱ्यांनो सांगा, कुठे नेणार रयतेचा श्वास? ॥८॥

मोफत राशन—लाडकी बहीण, नोटांनी मतांचा सौदा,
शिक्षण—आरोग्य हक्क झाले, तेव्हाच तुटेल गुलामीची बेडी ॥९॥

शिक्षकाला कामगार केलं, ना पगार ना सन्मान,
भुकेल्या गुरूच्या हातून, घडणार नाही सशक्त मानव ॥१०॥

विद्यार्थ्यांनो उठा आता, रस्त्यावर या पेटून,
शाळा वाचवा, देश वाचवा, अन्यायाला ठेचून ॥११॥

शिक्षकांनो संघटित व्हा, निर्भयपणे करा काम,
लोकांच्या लेकरांसाठी, उघडून लढा हा संग्राम ॥१२॥

आज नाही उठलो जर, तर उद्या इतिहास बोलेल—
"शिक्षण विकलं म्हणून, देश गुलाम बनेल!" ॥१३॥

आज शाळा विकताहेत, उद्या माणूस विकतील,
ज्ञानाच्या चितेवरती, सत्तेचे सिंहासन उभारतील ॥१४॥

**प्रभाकर गायकवाड**
**छत्रपती संभाजीनगर**






## जुन्या गाड्या वापरणे आता महागणार



**मुंबई :** महाराष्ट्र विधिमंडळात आज 'महाराष्ट्र मोटर वाहन कर (सुधारणा) विधेयक, २०२६' एकमताने मंजूर केले असून, यामुळे राज्यातील जुन्या आणि प्रदूषणकारी वाहनांवरील पर्यावरण करात वाढ करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी या विधेयकाची माहिती देताना स्पष्ट केले की, वाढत्या वायू प्रदूषणावर प्रभावी नियंत्रण मिळवण्यासोबतच पर्यावरण संरक्षण, आर्थिक शिस्त आणि औद्योगिक विकास यांचा समतोल साधण्याच्या दृष्टीने हे विधेयक अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे.

या नवीन सुधारणेनुसार, दुचाकी वाहनांसाठीचा पर्यावरण कर २००० रुपयांवरून ४००० रुपये, पेट्रोल वाहनांसाठी ३००० रुपयांवरून ६००० रुपये, तर डिझेल वाहनांसाठी ३५०० रुपयांवरून ७००० रुपये इतका वाढवण्यात आला असून, हा कर दर पाच वर्षांसाठी एकरकमी भरावा लागणार आहे. या सुधारित कर रचनेमुळे राज्य सरकारला वर्षाला अंदाजे १६० कोटी रुपयांहून अधिक अतिरिक्त महसूल मिळणे अपेक्षित आहे. हा सर्व निधी रस्ता सुरक्षा, अद्ययावत परिवहन सुविधा, एटीएस प्रणालीचे बळकटीकरण आणि संबंधित प्रशिक्षणासाठी विनियोग करण्यात येणार आहे.

तसेच औद्योगिक क्षेत्राला मोठा दिलासा देत क्रेन वाहनांवरील मोटार वाहन करासाठी ३० लाख रुपयांची कमाल मर्यादा निश्चित करण्यात आली आहे, ज्यामुळे राज्यातील बांधकाम आणि पायाभूत सुविधा क्षेत्रातील गुंतवणुकीला नवी गती मिळण्याची अपेक्षा आहे. या विधेयकामुळे नागरिकांना बीएस-६ आणि इलेक्ट्रिक वाहनांच्या वापरासाठी प्रोत्साहन मिळणार असून, त्यातून ग्रामीण व आदिवासी भागांत मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. विशेष म्हणजे, या निर्णयामुळे राज्याच्या तिजोरीवर कोणताही अतिरिक्त आर्थिक भार न पडता उलट महसुलात वाढ होणार आहे. सर्वपक्षीय सदस्यांनी या विधेयकाला एकमताने मंजुरी दिल्याने महाराष्ट्राच्या शाश्वत आणि सर्वांगीण विकासाच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल ठरले आहे.

मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले, या विधेयकामुळे राज्याच्या एकत्रित निधीवर कोणताही अतिरिक्त बहार पडणार नसून उलट महसूल वाढीस मदत होणार आहे. सभागृहातील सर्व पक्षांच्या सदस्यांनी या विधेयकाचे स्वागत करत एकमताने मंजूरी दिली, त्यामुळे राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी हा निर्णय महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याचे मत सरनाईकांनी व्यक्त केले.

## आता भल्या पहाटे

आता भल्या पहाटे
उठून बसतो झोपेतून
सूर्य उगण्याआधी..

खरं तर
कितीही थकलो तरी
लागत नाही गाढ झोप
चिंतेच्या मुंग्यांची रांग
वळवळत असते
नसानसात म्हणून..

आता वाटत नाही
पडावं घराबाहेर
पण इतभर पोटाची तगमग
भाग पाडते गुलामी करण्यास
नोकर झाल्यापासून..

खरं तर कुणब्याचा लेक मी
रक्तातच सवय
काबाड कष्ट करण्याची
पण शेतीचं गणित चुकल्यापासून
आलोय मी सिमेंटच्या जंगलात
काम धंद्यासाठी..

पण इथलं गणितच उलटं
काम कमी केलं तरी चालतं
पण हाऽ जीऽ हाऽ जी ऽ करण्यात
पडू नये कमी नोकरानं
हे इथलं खरं गणित..

अन् मी करत नाही
हाऽ जीऽ हाऽ जी ऽ
तर दाखवल्या जातात चुका
प्रत्येक कामात हजार..

इतकं करून ही
कामचुकारचा ही शिक्का
लागलाय आताशा
कामचुकार कडूनच
याचं येतंय हसू..

पण थांबत नसते वेळ
एका जागेवर तशीच
या आशेने सहन करत
चालतोय पुढे..

आपली वेळ येण्याची वाट पाहत
शेवटी प्रश्न पोटाचा आहे..

**ज्ञानेश्वर गायके, कन्नड**

## गुढीपाडव्याचा सण हा....

हिंदू नववर्षाची सुरुवात
निसर्गात हर्षवलास दाटतो
गुढीपाडव्याचा सण हा
नव आनंद घेऊन येतो

घराघरांवर उभारूया गुढी
आपसातली सोडवू अढी
संदेश असा हा एक मानावा
चैत्र प्रतिपदा — गुढीपाडवा

वनवास बारा वर्षाचा
संपूनी प्रभुराम आले
स्वागताला त्या समायापासूनी
गुढी उभारणी स्वागत झाले

नव्या वर्षी नवे स्वप्न पाहू
देवाची लेकरे माणुसकीने राहू
मानवात देव शोधू
बंधूभावाने व एकजुटीने आपण सारे राहू

सर्वांना नूतन वर्ष आनंदाचे
जावो हीच सदीच्छा
नव वर्ष आणि गुढीपाडव्याच्या
सर्वांना खूप खूप शुभेच्छा

**संदीप वाकडे पाटील**
रा.खेडा ता. कन्नड
९७६६९९२७७६

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १९ मार्च २०२६


## बीडमधील बोगस कामगार प्रकरणाची चौकशी करून दोषींवर कारवाई करणार

**बीड (भगवंत पाळवदे) :** मुंबई, दि.१७: कामगार विभागाने राज्यभरात दक्षता पथकांच्या माध्यमातून ४६ ठिकाणी गुन्हे दाखल केले आहेत, बीड प्रकरणातही स्वतंत्र अधिकाऱ्यामार्फत सखोल चौकशी करण्यात येईल. तसेच, उपलब्ध पुरावे सादर करण्याचे आवाहन करत, दोषींवर शंभर टक्के कारवाई करण्यात येईल, अशी ग्वाही मंत्री ॲड आकाश फुंडकर यांनी विधानसभेत दिली.बीड जिल्ह्यात बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांतर्गत मार्च २०२० ते फेब्रुवारी २०२६ दरम्यान बोगस मृत कामगार दाखवून कोट्यवधींचा अपहार झाल्याच्या आरोपाबाबत विधानसभेत सदस्य सुरेश धस यांनी लक्षवेधी सूचना मांडली.उत्तर देताना कामगार मंत्री ॲड. फुंडकर यांनी सांगितले की, राज्यात काही ठिकाणी बोगस एजंटांकडून बनावट कागदपत्रे आणि खोटे सही-शिक्के तयार करून शासनाच्या योजनांचा गैरफायदा घेतला जात असल्याचेही त्यांनी नमूद केले. अशा प्रकारांना कोणतीही सहानुभूती दाखवली जाणार नसून दोषी अधिकारी, संबंधित संस्था किंवा इतर कुणीही असले तरी त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल.पूर्वी कामगार नोंदणी प्रक्रिया ऑफलाइन असल्यामुळे अशा गैरप्रकारांना वाव होता. ही त्रुटी दूर करण्यासाठी नोंदणी प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाइन करण्यात आली असून त्यात बायोमेट्रिक प्रणालीचा समावेश करण्यात आला आहे, ज्यामुळे फसवणूक रोखण्यास मदत होणार आहे.मंत्री फुंडकर यांनी सांगितले की, २०२० ते २०२६ या कालावधीत बीड जिल्ह्यात ११५ अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी एक अपघाती मृत्यूचा अर्ज खरा आढळला असून उर्वरित ११४ अर्जांची तपासणी सुरू आहे. आतापर्यंत ५३ प्रकरणांमध्ये अनियमितता आढळलेली नाही, तर उर्वरित प्रकरणांची पडताळणी सुरू आहे.

## 'ट्रॅव्हल अँड टुरिझम' कोर्समुळे विद्यार्थिनींसाठी करिअरच्या नव्या वाटा खुल्या



**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. सौ. इं. भा. पा. महिला कला महाविद्यालयाच्या इतिहास विभागातर्फे आयोजित 'ट्रॅव्हल अँड टुरिझम' शॉर्ट टर्म सर्टिफिकेट कोर्स दि. २७ फेब्रुवारी ते १८ मार्च २०२६ दरम्यान यशस्वीरीत्या पार पडला.या कोर्ससाठी स्वामी रामानंद तीर्थ संशोधन संस्थेचे सचिव श्री. सारंग टाकळकर यांनी मार्गदर्शन केले. इतिहास विभागातर्फे आयोजित हा सातवा कोर्स असून विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त सहभाग लाभला, अशी माहिती विभागप्रमुख डॉ. सुषमा देशपांडे यांनी दिली. कोर्सअंतर्गत विद्यार्थिनींसाठी विविध उपक्रमांसह दि. १३ मार्च रोजी हैद्राबाद येथील 'हैद्राबाद मुक्तिसंग्राम : मराठवाड्याची अस्मिता' संग्रहालयास शैक्षणिक सहल आयोजित करण्यात आली. तसेच ५० गुणांची लेखी परीक्षा व पर्यटन विषयावरील भित्तिपत्रक सादरीकरण घेण्यात आले. समारोप प्रसंगी श्री. टाकळकर यांनी पर्यटन क्षेत्रात करिअरच्या संधींबाबत मार्गदर्शन केले. पोस्टर स्पर्धेत कु. सपनाराणी मलिक, कु. कल्याणी लोखंडे, कु. ऋतुजा साळवे व कु. प्राजक्ता सरोने या विद्यार्थिनींनी यश संपादन केले.कार्यक्रमाचे उद्घाटन प्राचार्या डॉ. सुनिता बाजपाई यांच्या हस्ते झाले. सूत्रसंचालन कु. भार्गवी मोदी हिने, तर आभार प्रदर्शन प्रा. कविश्री देशमुख यांनी केले.

## व्हियेतनाम या लहानग्या देशानं अमेरिकेसारख्या बलाढ्य देशाला नमवलं होतं

**ज**वळपास वीस वर्षे चाललेल्या या युद्धात अमेरिका पराजित झाली होती. विजयानंतर व्हियेतनामच्या राष्ट्राध्यक्षांना एका पत्रकाराने एक प्रश्न विचारला. साहजिकच तो युद्ध कसे जिंकलात हाच असणार ! किंवा अमेरिकेला कसं नमवलं हाच असणार ! त्यावर दिलेलं हे उत्तर नक्की वाचा...!!"मुळात अमेरिका बलाढ्य देश. मात्र त्याच बलाढ्य देशाला नमवण्यासाठी मी एका महान राजाचं चरित्र वाचलं होतं. त्यातून मिळालेल्या प्रेरणेतून मी युद्धनीतिचा वापर केला आणि सहज विजय संपादन केला. पुढे पत्रकारानं विचारलं की, कोण होता तो महान राजा ?...मित्रांनो जेव्हा मी वाचलं तेव्हा माझीही छाती चांगलीच फुगली, जशी आता तुमची फुगेल. तर या प्रश्नावर व्हियेतनामचे राष्ट्राध्यक्ष जागेवर उभे राहिले आणि "छत्रपती शिवाजी महाराज" असं नाव घेतलं. नाव घेत असताना त्यांच्या डोळ्यांत एक वेगळेच तेज दिसत होतं !!पुढे ते म्हणाले की, असा राजा जर आमच्या देशात जन्माला आले असते तर आज आम्ही जगावर राज्य केलं असतं.काही वर्षांनंतर या राष्ट्राध्यक्षांचा मृत्यू झाला आणि त्यांनी आपल्या समाधीवर "शिवाजी महाराजांचा एक मावळा समाधीस्थ झाला" असं लिहून ठेवलंय....कालांतराने व्हियेतनामच्या परराष्ट्रमंत्र्यांनी भारताचा दौरा केला. ठरलेल्या राजकीय कार्यक्रमानुसार त्यांना लाल किल्ला आणि गांधीजींची समाधी दाखवण्यात आली.मात्र हे दाखवत असताना त्यांनी शिवाजी महाराजांची समाधी कुठे आहे हे विचारलं. तेव्हा भारतीय सरकार थबकलं आणि रायगड असा उल्लेख केला. परराष्ट्र मंत्री रायगडावर आल्या आणि महाराजांच्या समाधीचं दर्शन घेतलं.समाधीचं दर्शन घेतल्यानंतर त्यांनी रायगडावरची माती उचलली आणि आपल्या बॅगमध्ये भरली. यावर पत्रकारांनी या मातीमागचं कारण विचारलं. त्यावर मंत्री महोदय म्हणाल्या की, ही माती शूरांची आहे. "या मातीत महान राजा जन्माला आला. हिच माती मी माझ्या देशाच्या मातीत मिसळणार आहे. जेणेकरून आमच्या देशामधे असे शूर वीर पुरुष जन्माला येवोत. छत्रपती शिवाजी महाराजांचा फक्त महाराष्ट्राला हेवा वाटावा असे नसून संपूर्ण जगाला हेवा वाटावा असाच आहे. !!!छत्रपती शिवाजी महाराज की जय !!*

**प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे,**
**जालना.**

## चैतन्याची गुढी

नववर्षाची उजळली
सोनेरी शुभ पहाट
मंगलमय वातावरणात
उंच गुढीचा थाट

वसंत आला नाचत
चैत्राची पालवी बहरली
कोकिळेच्या स्वागताला
सारी आमराई मोहरली

नववर्षाच्या शुभदिनी
नवे संकल्प करूया
सलोख्याचे तोरण बांधून
कटूता कायम विसरूया

सौख्य आणि मांगल्याचा
सण गुढीपाडवा
एकमेकांस प्रेम वाटूनी
वाढवू आपसात गोडवा

मराठी अस्मिता बाळगूनी
उभारू चैतन्याची गुढी
स्नेहाची करूनी देवाणघेवाण
विसरूया मनातील अढी



**- रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६

## आयुष्याच्या संध्याकाळी

आयुष्याच्या संध्याकाळी,
आठवतात सारे कृत्य.
तरुणपणा मावळताना,
करतात आठवणी नृत्य.

भावनांची आंदोलने,
आता मनात करतात घर.
तरुणपणाच्या तरुणाईची,
येत नाही जगण्याला सर.

आयुष्याच्या संध्याकाळी,
कर्मांचा हिशोब जुळत नाही.
काय केले काय राहिले,
मन हिशोब करून पाही.

नाते सारे स्वार्थाचे दूर गेले,
नाही राहिले कुणी आपले.
आयुष्याच्या संध्याकाळी,
आपुलकीचे दोर कुणी
कापले.

आयुष्याच्या संध्याकाळी,
जीवन लागले कळायला.
सत्य कळता मन लागले,
जीवनापासून दूर पळायला.
सारेच नाते होते जीवनात,
आपमतलबी अन् स्वार्थी.
मीच होतो पळत एकटा,
मदतीस सर्वांच्या निस्वार्थी.

**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**
**मो.नं.९७६३२८३७०४**


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

जाहिरात दर

१. पूर्ण पान (मल्टीकलर) ५०००/-
२. अर्धे पान (मल्टीकलर) ३०००/-
३. पाव पान (मल्टीकलर) २०००/-
४. शुभेच्छा जाहिरात ६००/-